भोकरखेड येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबास वेतनातून मदत व शासकीय योजनेचा लाभ >> पान 2

मुंबई मोर्चाला मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे >> पान 3

पेनटाकळी प्रकल्पातील पाणी पाझरामुळे नुकसान झालेल्या उर्वरीत १०९ शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई! >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

सुविचार

सकारात्मक विचारांमुळे जीवन आनंदी होते.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 19 ■ गुरूवार, दि. 07 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



इश्क सिनेमात आयटम साँग करणाऱ्या अभिनेत्रीच्या अडचणी वाढल्या, अश्लील जाहिरात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

आतील पान

# लाडक्या दाजींवर कारवाई होणार

## गुन्हा दाखल करून लाभ रक्कम वसूल करणार, २६ लाख लोकांचा डेटा व्हेरिफाय कामाला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर घाईघाईने राबवलेली महाराष्ट्र सरकारची महत्त्वकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ' योजना सातत्याने चर्चेत राहिली. आधी सरसकट पात्र ठरवलेल्या महिलांना आता पडताळणी केल्यानंतर १४००० पुरुषांनीच या योजनेचा लाभ घेतल्याचा समोर आल्यानंतर आता पुढील १५ दिवसात लाडक्या बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत .

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,महिला आणि बालकल्याण खात्याकडून सुमारे २६ लाख लाभार्थ्यांची माहिती महिला व बालकल्याण विभागाकडे पाठवण्यात आली आहे .त्यानुसार या खात्यांची सखोल पडताळणी सुरू असून अनेक प्रकरणांमध्ये लाभार्थी महिलांच्या नावावर लाभ मंजूर झाला असला तरी बँक खाते मात्र पुरुषाचा असल्याचा दिसून आला आहे .

या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने बोगस लाभार्थ्यांकडून ११ महिन्यांचा संपूर्ण लाभ रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे .या निर्णयानुसार प्रत्येक बोगस खात्याकडून १६५०० वसूल करण्यात येतील .इतकंच नव्हे तर याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात येणार आहे .मात्र ज्या महिलांनी त्यांच्या स्वतःच्या खात्याऐवजी इतर कुटुंबीयांचे खाते तात्पुरते जोडले आणि नंतर ते बदलले अशा लाभार्थींचा लाभ सुरू राहणार आहे .पण यात जर काही बोगस माहिती समोर आली त्यांच्याकडून ११ महिन्यांचे पूर्ण पैसे वसूल करण्यात येणार आहेत.

निवडणुकीच्या तोंडावर घाईघाईने राबवलेल्या महायुती सरकारच्या लाडकी बहिणी योजनेत सुरुवातीला सर्रास सरसकट महिलांना पात्र ठरवण्यात आलं . त्यांचा खात्यात थेट पैसेही जमा झाले .हे पैसे नक्की कोणाला मिळाले याची मोजतात खुद्द सरकारकडेही नव्हती .पात्र पात्र ठरवण्याचा सक्षम यंत्रणाही नसल्यामुळे या योजनेचा अनेकांनी गैरफायदा घेतला .विशेष म्हणजे पुरुषांनी महिलांच्या नावावर खोट्या कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेतल्याचा समोर आलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील तब्बल २६ लाख ३४ हजार लाडक्या बहिणी विविध कारणांनी अपात्र ठरल्याचं जाहीर करण्यात आलं .यावेळी काही ठिकाणी पुरुषांनी या योजनेसाठी अर्ज केल्याचं निदर्शनास आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे .लाडकी बहीण योजनेत तब्बल ४८०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला .हा सॉफ्टवेअर पासून झालेला घोटाळा असल्याचं त्यांचा आरोप होता .दरम्यान लाडक्या बहिणी योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.

## कारच्या भीषण अपघात युवक ठार; शहरातील पाटील धाब्यासमोरील घटना



**वाशीम/प्रतिनिधी :** कार अनयंत्रित होऊन झालेल्या भीषण अपघातात युवक ठार झाला. सदर घटना शहरातील पाटील धाबा समोरच्या ६ ऑगस्ट रोजी सकाळी घडली. सदर घटनेत गणेश गोटे,(तोंडगाव) हा ठार झाला आहे. प्राप्त माहितीनुसार गणेश गोटे हा कारने जात असताना कार अनियंत्रित झाल्याने कारचा अपघात झाला.सदर घटनेत गणेश गोटे याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती स्थानिक नागरिकांनी पोलिस कंट्रोल रूमला दिली.माहिती मिळताच शहर स्टेशनचे ठाणेदार देवेंद्र सिंह ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. अपघाताचे कारण वुत्त लिहीपर्यंत समजू शकले नाही.

## अवैध दारु विक्रीवर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाची कारवाई; २ लाख ६२ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वाशीम/प्रतिनिधी :** अवैधरित्य दारुविक्री करणाया इसमांवर कारवाई करून देशी विदेशी दारुसह मोबाईल व दुचाकी असा एकूण २ लाख ६२ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदर कारवाई ५ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाच्या वतीने करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार ५ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, वाशीम ते पुसद मंगरुळपीरकडे जाणाया रोडवरील अवैधरीत्या दारू वाहतूक केली जात आहे. सदर माहितीवरून पोलीसांनी सापळा रचून रेल्वे उडाणपुलाजवळ अवैधरित्या दारु वाहतूक करणाया इसमावर कारवाई केली असता, आरोपी हा अवैधरित्य देशी दारुची वाहतूक करताना मिळून आला. त्याने, सदरचा माल तो कुंभी, ता. मंगरुळपीर येथील हॉटेल निसर्ग रेस्टॉरंट ढाबा व हॉटेल दराडे मामा ढाबा येथे पुरवठा करतो असे सांगितल्यावरुन हॉटेल निसर्ग रेस्टॉरंट ढाबा व हॉटेल दराडे मामा ढाबा येथे रेड करुन कार्यवाही करण्यात आली. नमुद तिनही घटनास्थळावरुन व आरोपीकडून ५२ हजार ६५२ रुपयांची देशी विदेशी दारु,१ लाख १० हजार रुपये किंमतीचे ४ मोबाईल व १ लाख रुपये किंमतीची एक दुचाकी असा एकूण २ लाख ६२ हजार ६५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर अवैध दारु विक्री करणाया आरोपीविरुिद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशनवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## बच्चू कडूंचं मराठवाड्यात कर्जमाफी यात्रेत सहभागी होण्यासाठी मनसे 'निमंत्रण'

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रहार संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थावर निवासस्थानावर जात भेट घेतली. यावेळी बच्चू कडू यांनी राज ठाकरे यांना मराठवाड्यामध्ये काढण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफी यात्रेमध्ये सहभागी होण्याचा आवाहन केलं. या आवाहनानंतर राज ठाकरे यांनी सुद्धा सकारात्मक प्रतिसाद दिला. राज ठाकरे यांच्या भेटीनंतर बोलताना बच्चू कडू यांनी सांगितलं की, शेतकऱ्यांचा राज ठाकरे यांना अभ्यास आहे. मात्र, शेतकरी म्हणून शेतकरी एकत्र येत नाहीत, ही राज ठाकरे यांची खंत असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. बच्चू कडू यांनी म्हटलं आहे की, राज ठाकरे यांच्या भेटीमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरती सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी होणाऱ्या आगामी आंदोलनाची दिशा, धोरणे आणि मागणी मागण्या यावर राजसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली विचार मंथन करण्यात आले. मराठवाड्यातून निघणाऱ्या कर्जमाफी यात्रेसाठी राज साहेबांना औपचारिक आमंत्रण देण्यात आलं आह.

# माधुरी हत्तीण कोल्हापूरमध्ये आणण्याचे कोर्ट आदेश देईल अशी अपेक्षा : मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** वनताराच्या अधिकाऱ्यांना बोलावले होते.त्यांच्याशी चर्चा केली. त्या चर्चेमध्ये त्यांनी हे सांगितले की, माधुरी हत्तीणीवर हक्क सांगायची आमची कुठलीही इच्छा नाही. आम्हाला कोर्टाने सांगितल्यामुळे आम्ही हे सर्व केले आहे. माधुरी हत्तीण कोल्हापूरमध्ये आणण्याचे कोर्ट आदेश देईल अशी अपेक्षा आहे. असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, मला या ठिकाणी येऊन आनंद वाटला, वारकरी परंपरा जपतात ते पाहून समाधान वाटत आहे. त्यानंतर मी त्यांना सांगितले जर असे असेल, तर तुम्ही देखील आमच्यासोबत सुप्रीमकोर्टमध्ये जॉईन झाल पाहिजे, आपण जॉईंटली कोर्टाला विनवणी करू की, माधुरी हत्तीण तेथेच कोल्हापूरमध्ये नागणी मठ मध्ये एक रेस्क्यू सेंटर तयार करून ठेवू. हायपावर कमिटीने जे निर्देश दिले आहेत. त्या निर्देशानुसार सर्व प्रकारच्या सोयी तेथेच करू, तेथेच तो माधुरी हत्तीणीला आणू, तुम्ही त्याला समर्थन द्या. अशी मागणी केली. त्याला त्यांनी समर्थन दिले आहे. जर कोर्टाने तसा निर्णय दिला, कोर्ट तसा निर्णय देईल अशी अपेक्षा आहे. तसे झाले तर सर्व तयार करून द्यायला तयार आहेत.असे वाटते की तिकडे आस्था आहे, लोकभावना आहे. आणि दुसरीकडे लोक आरोग्य देखील आहे, दोघांची सांगड आपल्याला घालावी लागेल. धार्मिक भावना जपण्याच्या दृष्टीने आपल्याला काय करता येईल. आणि त्यातून आरोग्याला कुठलाही धोका होणार नाही, अशा प्रकारचा मार्ग काढण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहे. काही मार्ग आम्हाला सुचलेले देखील आहे.ते आम्ही कोर्टासमोर मांडू, जेणेकरून इतक्या वर्षाची जी परंपरा आहे. तीदेखील खंडित होणार नाही, आणि आरोग्याचे ही प्रश्न निर्माण होणार नाही. मला असे वाटते की, ते सर्वपक्ष कन्फ्युज आहेत. कोणी काय करावे कुणाला समजत नाही. कुणाचा ताळमेळ कुणाच्या पायात



नाही. सकाळी बोलणारे संध्याकाळी वेगळं बोलतात. दुसऱ्या दिवशी वेगळं बोलतात, जनता यांच्यावर विश्वास ठेवायलाही तयार नाही. एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे दिल्लीत दोन्ही आपल्या सहकाऱ्यांना भेटायला गेले असावे. शिंदे पीएमला भेटत आहेत आणि उद्धव ठाकरे त्यांचे सहकारी राहुल गांधी यांना भेटत आहेत.बेस्ट बद्दलचे निर्णय मी घेत नाही, ते निर्णय महानगरपालिका प्रशासन घेत आहे. अध्यात्माची शक्ती आमच्या पाठिशी आहे, कर्तव्य आणि अध्यात्म हे एकत्रित चालते. महाराष्ट्रमध्ये प्रयोग करण्यात आला होता, यामध्ये त्यांना यश मिळाल मात्र, त्यानंतर लोकांच्या लक्षात आले. आणि लोकांनी त्याला नाकारले. प्रधानमंत्री यांनी जो नारा दिला एक है तो सेफ है त्यावर संपूर्ण समाज जागे झाला.असे मतही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ७५ कोटी रुपयांची मदत जाहीर

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश : शेतकऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण केला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** लोकसभा मतदारसंघात व विशेष करून मेहकर लोणार तालुक्यात झालेल्या पंचवीस व २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने बुलढाणा जिल्ह्यात ८७ हजार ३९०.२ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले होते यामध्ये ९०३८३ शेतकऱ्यांना फटका बसला होता जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त भागाची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळवून देण्याची आश्वासन दिले होते दिलेल्या आश्वासनाप्रमाणे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी लोकसभा मतदारसंघातील ९० हजार ३८३ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तब्बल ७४ कोटी ४५ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.





बुलढाणा लोकसभा मतदारसंघात मागील २५ व २६ जून २०२५ या कालावधीत ढगफुटीसदृश्य व अतिवृष्टीमुळे ८७ हजार ३९०.२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग अद्वल झाला सृष्टीचा ९० हजार ३८३ शेतकऱ्यांना फटका बसला होता. अतिवृष्टीने अद्वल झालेल्या शेतकऱ्यांना आधार देत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आ.संजय रायमुलकर यांनी स्वतः हा शेतकऱ्यांच्या बांधावर जावून नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली व नुकसान भरपाईची मागणी केली होती. सदर मागणीची दखल घेत बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी परीपत्रक काढून ७४ कोटी ४५ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.२५ व २६ जून २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर मतदारसंघात सरासरी २१२ मिमी पावसाची नोंद झाली होती. या अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचा मोबदला द्यावा, यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर यांनी पाठपुरावा केला होता. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या पाठपुरावामुळे मेहकर मतदारसंघातील शेतकऱ्यांना तब्बल ६६ कोटींची नुकसान भरपाई मिळणार आहे. मेहकर मतदारसंघातील एकूण ६५,६०१ हेक्टर शेती क्षेत्र बाधित झाले असून ६६ हजार नुकसानग्रस्त शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये जमीन खरडून जाणे,फळबागांचे नुकसान आणि गाळ साचल्यामुळे पीक नष्ट होणाऱ्या सुमारे ६ हजार शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे.या तातडीच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त करत मतदारांना दिलेला शब्द पाळला असल्याच्या प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केल्या असून मतदार संघातील शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर झाल्याबद्दल शेतकऱ्यांनीही समाधान व्यक्त केले आहे.









# भोकरखेड येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबास वेतनातून मदत व शासकीय योजनेचा लाभ

## महसूल सप्ताह निमित्त प्रशासनाची आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यात महसूल सप्ताह मोठ्या उत्साहात राबविण्यात येत असून महसूल कर्मचाऱ्यांचे पथक गावोगावी भेटी देत आहेत भोकरखेड येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मंडळ अधिकारी व ग्राम महसूल सेवक यांनी वेतनातून आर्थिक मदत केली व शासनाच्या विविध योजना मिळाव्या याकरिता अर्ज भरून घेतला सदर कार्यक्रम हा तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनात महसूल सप्ताह निमित्त राबविण्यात आला.

महसूल सप्ताह निमित्त तालुक्यात प्रत्येक मंडळनिहाय गावात तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल कर्मचाऱ्यांचे पथक गावोगावी भेटी देत आहेत तहसीलदार यांच्या मार्गदर्शनात महसूल सप्ताह राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने आज दिनांक सहा ऑगस्ट रोजी महसूल सप्ताह निमित्त भोकरखेड येथे कवठा






मंडळातील मंडळ अधिकारी आणि सर्व ग्राम महसूल अधिकारी सरपंच पोलिस पाटील व प्रतिष्ठित नागरीक यांनी नामदेव शंकर रंजवे ह्या आत्महत्या झालेल्या शेतमजुराच्या कुटुंबास भेट दिली. भोकरखेड येथील नामदेव शंकर रंजवे यांनी मागील सहा महिन्यापूर्वी गरिबीला कंटाळून विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे आधीच हालाखीची परिस्थिती व त्यातच वडिलांचे छत्र हरवल्यामुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यांच्या पत्नी शशिकला यांच्यासमोर मुलीच्या शिक्षणाचा व लग्नाचा प्रश्न उभा ठाकला आहे आज पर्यंत त्यांना शासनाकडून कोणतीही मदत मिळालेली नाही भोकरखेड येथील ग्राम महसूल अधिकारी शिवकन्या कोतीवार यांनी नामदेव रंजवे यांच्या पत्नी शशिकला बाई यांची संजय गांधी निराधार योजनेची फाइल भरून घेतली. तसेच मंडळातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनंची माहिती दिली आत्महत्याग्रस्त कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हालाखीची असल्यामुळे मंडळ अधिकारी आणि सर्व ग्राम महसूल सेवक यांनी त्यांच्या वेतनातून त्यांना आर्थिक मदत केली. तसेच यापुढे कवठा मंडळामध्ये अशी काही दुर्दैवी घटना घडल्यास सर्वांच्या वेतनातून त्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याचे ठरविले आहे. या प्रसंगी मंडळ अधिकारी गजानन गरकळ, ग्राम महसूल अधिकारी सतीश सडके, डी. टी.गिरी, रुपेश मुलगे, स्वप्नील धांडे श्रीमती भावना पुरोहित आणि श्रीमती शिवकन्या कोतिवार आणि गावातील सरपंच, पोलीस पाटील व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## दोन राष्ट्रगीतांचे जनक; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर – सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्द्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

# 'अभी ये तो ट्रेलर है', दादर कबुतरखान्यातील राड्यानंतर जैन संतांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई हायकोर्टाच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेने ताडपत्रीच्या शेडने दादरमधील कबुतरखाना बंद केला होता. या बंद केलेल्या कबुतरखान्याच्या मुद्यावरून आज जैन समाजाने आक्रमक भूमिका घेतली. जैन समाजाच्या नागरिकांनी आणि पक्षी प्रेमींनी आज कबुतरखान्याच्या शेडवर हल्लाबोल केला. यावेळी पोलिसांनाही धक्काबुक्की केली. त्यानंतर हा फक्त ट्रेलर असून पिक्चर दाखवावा लागू नये असा इशारा जैन संतांनी माध्यमांशी बोलताना दिला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील कबुतरखान्यांसंदर्भात प्रशासनाकडून कारवाईला सुरुवात झाली. सर्वप्रथम बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या पथकाकडून दादर येथील कबुतरखान्यावर शेड लावण्यात आले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या कबूतर खाण्यात पक्षांना खाणं टाकणाऱ्या लोकांवर मुंबई महानगरपालिकाकडून दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात झाली होती. दादरमधील प्रसिद्ध कबुतरखान्यावर काही दिवसांपूर्वी शेड लावण्यात आली होती.

आज, सकाळी दादरमधील जैन मंदिरात प्रार्थना सभा झाली. या सभेनंतर अचानक एक मोठा जमाव रस्त्यावर आला. या पुरुष-महिलांचा समावेश असलेल्या या जमावाने थेट कबुतरखान्याच्या दिशेने धाव घेतली. यावेळी पोलिसांनी अटकाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र, जमावाने पोलिसांना धक्काबुक्की केली. त्यानंतर जमावातील एका गटाने थेट कबुतरखान्यावर असलेले ताडपात्रीचे शेड हटवले. या जमावाने मुंबई हायकोर्टाच्या आदेशाने बंद करण्यात आलेला कबुतरखाना खुला करण्याचा प्रयत्न झाला. यावेळी शेडची तोडफोड करण्यात आली. ताडपात्री हटवण्याचा प्रयत्न केला.

जमावाच्या आक्रमकतेनंतर जैन संतानी, अध्यात्मिक नेत्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, प्रार्थना सभेत आम्ही कोणतीही सूचना केली नव्हती. मात्र, लोकांनी उत्सुर्फपणे आंदोलन केले. आम्ही त्यांना शांततेचे आवाहन केले आहे. हे आंदोलन फक्त ट्रेलर आहे. मात्र, पिक्चर पाहायचा नसेल तर सरकारने तातडीने पावले उचलावी असेही त्यांनी म्हटले.

मुंबईतील दादर आणि इतर ठिकाणचे कबुतरखाने मुंबई महापालिकेने बंद केल्यानंतर जैन समाजाने आणि पक्षीप्रेमींनी आंदोलनाचा पवित्रा घेत विरोध केला होता. मंगळवारी, मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कबुतर खान्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला होता. कोणत्या वेळेत कबुतरांना फिडिंग व्हावे आणि कोणत्या वेळेत नाही, असा नियम तयार करता येईल. आरोग्याच्या समस्यांचा शास्त्रीय अभ्यास करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. कबुतरखान्याबाबत हायकोर्टात राज्य सरकार आणि महापालिकेने ठाम भूमिका मांडावी अशी सुचना करताना त्यांनी पर्यायी व्यवस्था होईस्तोवर महापालिकेने कंट्रोल फिडिंग करावे, असेही निर्देश दिले.

## माधुरी हत्तीण आणि कबुतर खानाबद्दल राज्य सरकार सकारात्मक आहे – अजित पवार




**नांदेड/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदी कोणाला बसवायचे हे न्यायालय ठरवते. त्यात राज्य आणि केंद्र सरकारचा हस्तक्षेप नसतो. उपमुख्यमंत्री अजित पवार हे माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या नांदेड येथील घरी सांत्वनपर भेट दिली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदी भाजपा प्रवक्त्या आरती साठे यांच्या नियुक्तीवरुण विरोधकांकडून टीका केली जाते आहे. यावर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांच्या टीका खोडून काढल्या आहेत.

## खड्ड्यांवर रांगोळी काढून मनसेचे महापालिकेविरोधात आंदोलन



**कल्याण/प्रतिनिधी :** शहरातील उखडलेले रस्ते आणि ठिकठिकाणी पडलेले खड्डे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करत आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी बुधवारी उल्हासनगर महापालिकेविरोधात एक अनोखा आणि लक्षवेधी आंदोलन प्रकार केला.

हरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्ड्यांवर रांगोळी काढून आणि जोरदार घोषणाबाजी करत मनसे कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. ''हा विकास की विनाश?'', ''मनपा हाय-हाय'', ''खड्ड्यांपासून मुक्तता द्या'' अशा घोषणा देत आंदोलकांनी रस्त्यांवरील दुरवस्थेचे चित्र स्पष्ट केले. या आंदोलनाचे नेतृत्व मनसे जिल्हाध्यक्ष बंडू देशमुख आणि शहराध्यक्ष संजय घुगे यांनी केले. यावेळीं जिल्हा संघटक दिलीप थोरात, उपशहराध्यक्ष सचिन बेंडके यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. दरम्यान, आंदोलकांनी शांततेत आंदोलन सुरू ठेवले असताना सेंट्रल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले आणि त्यांना पोलीस ठाण्यात नेऊन आंदोलनाची सांगता केली.

## तुमच्या होम लोनचा हफ्ता वाढला की कमी झाला?

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय रिझर्व्ह बँके च्या मॉनिटरी पॉलिसी कमेटी चा निर्णय आला असून तीन दिवसांपासून सुरू असलेली मिटिंगनंतर आज गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी लाखो कर्जदारांसाठी महत्त्वाची घोषणा केली आहे. श्रृण समितीने रेपो रेट एकूण जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

# प्रसुती दरम्यान महिलेचा मृत्यू

## डॉक्टर व कर्मचायांच्या हलगर्जीपणामुळेच मृत्यू झाल्याचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** प्रसुती दरम्यान श्वेता पडघान (वय २४ ) या महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता दरम्यान जिल्हा स्त्री रुग्णालयात घडली. सदर महिलेचा मृत्यू डॉक्टर व कर्मचायांच्या हलगर्जीपणा मुळेच झाल्याचा आरोप महिलेच्या नातेवाईकांनी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. कर्मचायांच्या हलगर्जीपणामुळे नवजात बालकांचा मृत्यू झाल्या प्रकरणी जिल्हा स्त्री रुग्णालयातील तीन कर्मचायांना तात्काळ निलंबित केल्याची घटना ताजी असतानाच आता श्वेता पडघान या महिलेचा मृत्यू डॉक्टर व कर्मचायांच्या हलगर्जीपणा मुळेच झाल्याचा आरोप होत असल्याने जिल्हा स्त्री रुग्णालयातील आरोग्य सेवाबाबत जनतेत कमालीचा संताप व्यक्त केला जात आहे.

श्वेता पडघान महिलेचे काल अकरा वाजता दरम्यान सिझर झाले दोन-तीन तासानंतर पोटात वेदना होत असल्याने ऑपरेशन करुन सदरहू महिलेची ३.३० वाजता दरम्यान गर्भ पिशवी काढण्यात आल्याचे नातेवाईकांकडून सांगण्यात आले. मात्र, त्या नंतरही प्रकृतीत सुधारणा न होता अधिकच खालावल्याने ८.३० वाजता दरम्यान तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती केले असता त्या ठिकाणी सदरहू महिलेचा मृत्यू झाला. डॉक्टर व कर्मचायांच्या हलगर्जीपणा मुळेच सदरहु महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला.

# इश्क सिनेमात आयटम साँग करणाऱ्या अभिनेत्रीच्या अडचणी वाढल्या, अश्लील जाहिरात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध अभिनेत्रीशी संबंधित एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अभिनेत्रीवर पैशांच्या लालसेपोटी अश्लील चित्रपट आणि जाहिरातींमध्ये काम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार कोची येथील एर्नाकुलम सेंट्रल पोलिस स्थानकातून समोर आला आहे. दक्षिणेतील अभिनेत्री श्वेता मेनन यांच्याविरोधात आर्थिक फायद्यासाठी अश्लील चित्रपट व जाहिरातीत काम केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मलयाळम वृत्तसंस्था मातृभूमीच्या माहितीनुसार, सामाजिक कार्यकर्ता मार्टिन मेनाचेरी यांनी श्वेता मेनन यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्टाने स्थानिक पोलिसांना कारवाईचे आदेश दिले. आता अश्लीलता प्रतिबंधक कायदा आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिनेत्रीवर अश्लील चित्रपटात काम केल्याचा आरोप

श्वेता मेनन यांच्याविरुद्ध आता पोलिसांनी एफआयआर (गुन्हा) दाखल केला आहे. श्वेता फक्त दक्षिणेतील नाही, तर हिंदी चित्रपटांमध्येही काम केलेले आहे. त्यांनी रथिनिर्वेदम आणि साल्ट एन पेपर यांसारख्या मल्याळम चित्रपटांमध्ये काम केले आहे, तर हिंदीत बंधन (सलमान खान) आणि अशोका यांसारख्या चित्रपटांमध्येही त्या झळकल्या आहेत. पोलिसांनी सांगितले की, श्वेता मेनन यांनी आर्थिक फायद्यासाठी कथितपणे अश्लील चित्रपट आणि जाहिरातीत काम केले.

कोण आहेत श्वेता मेनन?

तक्रारीत श्वेता मेनन यांनी एका कंडोमच्या जाहिरातीत काम केल्याचा उल्लेखही आहे. २३ एप्रिल १९७४ रोजी जन्मलेल्या श्वेता मेनन या चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध नाव आहे. त्यांनी मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली आणि नंतर टेलिव्हिजन अँकर आणि अभिनेत्री म्हणून लोकप्रियता मिळवली. १९९४ साली त्या मिस इंडिया एशिया पॅसिफिकचा किताब जिंकल्या होत्या. त्यांनी मलयाळमसह हिंदी, तामिळ आणि तेलुगू चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांनी दोन केरल राज्य पुरस्कार 'सर्वोत्तम अभिनेत्री' म्हणून जिंकले आहेत तसेच दोन दक्षिण फिल्मफेअर पुरस्कारही पटकावले आहेत.

आमिर खान आणि अजय देवगणसोबत काम

हिंदी चित्रपटांच्या बाबतीत सांगायचं झालं, तर श्वेता मेनन यांनी १९९७ साली आलेल्या इश्क चित्रपटात 'हमको तुमसे प्यार है' या गाण्यात डान्स नंबर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यानंतर त्या सलमान खानच्या बंधनमध्ये आणि अजय देवगणसह अनेक मोठ्या स्टार्सच्या चित्रपटांत दिसल्या. त्यांनी सुमारे ३० हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुंबई मोर्चाला मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थितीत राहावे

## मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ





**सोलापूर/प्रतिनिधी :** आम्ही नवीन मोहीम राबवली. सभा घेतल्यानंतर बांधवांची चर्चा करतो आहे. धाराशिव पासून पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला.सोलापूर नंतर सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे आणि अहिल्यानगर दौरा असणार आहे. हा दौरा झाल्यानंतर मराठा बांधवांची चर्चा करून २९ ऑगस्ट रोजी मुंबईला सर्वांनी निघायचे आहे.ज्याची नोंद निघाली, त्यांनी गाडी घेऊन मुंबईकडे निघायचे, एक घर, एक गाडी निघणार हा नारा सोलापुरातून देतो.मुंबई मोर्च्यात मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, मीडियाच्या बांधवांची खोटं बोलून जमत नाही, ते चिरफाड करतात.

सोलापुरात दोन तासापासून बैठका सुरू होत्या. प्रत्येकाने आपली वाहन घेऊन निघायचे. एकदम सोपी मोहीम आहे. एक घर, एक गाडी घेऊन निघायचे. सोलापूरच्या युवकांना आवाहन करतो, आरपारची लढाई आहे. रेकॉर्ड ब्रेक सभा होणार. असा समुद्र मराठ्यांना कधीच बघायला मिळणार नाही. या लढाईचे तुम्ही साक्षीदार व्हा.२९ ऑगस्टची अंतिम लढाई असणार आहे.मुंबई जाताना शांततेत जायचे आणि शांततेत यायचे आहे. विजय मिळवल्याशिवाय परत यायचे नाही. सरकारने जर आपली माणस आंदोलनात घुसवले, तर एक इंचही मागे सरायचे नाही. मराठ्यांनी कुठेही जाळपोळ, दगडफेक करायची नाही. मुंबईकडे जाण्यासाठी ५ हजार पाण्याचे टँकर लागणार.मराठ्यांच्या डोक्यावरती आरक्षणाचा गुलाल टाकायचा म्हणजे टाकायचा. अंतरवाली सराटी येथून सकाळी १० वाजता आम्ही निघणार आहे. शिवनेरीचा पहिला मुक्काम करावा लागेल, आपले फक्त १५ किलोमीटरचे अंतर आहे. शिवनेरी वरून चाकण, राजगुरुनगर, लोणावळा, आझाद मैदान मार्गे जावे लागेल. यात जर मुलांचे हाल होत असेल, तर मार्ग बदलावा लागेल. स्थानिक संस्था निवडणूक आल्या म्हणून आम्ही आंदोलन कधीच करत नाही. २७ टक्के ओबीसी आरक्षण हा निर्णय चांगलाच आहे.जोपर्यंत सरकारकडून कुणबी आणि मराठा हा अध्यादेश येत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. मराठा आरक्षणासाठी जीव दिलेल्या लोकांच्या आर्थिकतेचा विचार केला जावा. अशा अनेक मागण्या आहेत. जोपर्यंत या मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही मुंबई सोडणार नाही. गेल्यावेळी आमची फसवणूक झाली, यावेळी आम्ही माघार घेणार नाही.६ महिन्यात सगे सोयऱ्याची अधिसूचना काढण्याची ग्वाही दिली होती. तिथे आमची फसवणूक झाली, आमची मागणी ओबीसी आरक्षणाची आहे. जे ७५ वर्षात झालेले नाही, तो लॉक मराठ्यांनी एका दिवसात तोडून दाखवला. जर सगेसोयऱ्याचे आरक्षण टिकणार नसेल, तर छगन भुजबळ त्याला विरोध का करत आहेत.

सगेसोयरे आरक्षणाला विरोध करण्यासाठी १०० ते १५० जणांची टोळी होती. त्यांनीच याला हरकती घेतल्या. सगेसोयरे हा कायदा टिकणारा असून विशेष मगासवर्ग, प्रवर्गांसाठी असून ज्या जाती ओबीसीत येतात त्यांच्या सर्वांच्या सगेसोयऱ्यांसाठी हा कायदा उपयोगी होणार आहे. २७ ऑगस्टच्या आधी अंमल बजावणी झाली, तर ठीक अन्यथा मी नंतर कोणत्याही मंत्र्याचे ऐकणार नाही. सगळ्याच पक्षातील नेत्यांना आवाहन की, लेकरांच्या भवितव्यासाठी मुंबईला चला. मराठ्यांच्या विजयासाठी आणि गरिबांच्या भल्यासाठी मुंबईकडे चला. तुम्ही सर्वजण एकच दिवस या मराठ्यांना आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी आमची. आंतरवाली सराटी या ठिकाणी जेव्हा मारहाण झाली, त्यावेळेस गृहमंत्री देवेंद्र फडणवीस होते. इतका प्राणघातक आणि क्रूर हल्ला आमच्या माय- माउलीवरती महाराष्ट्र मध्ये कधीच झाला नाही.

माय माऊलींचे रक्त सांडताना आम्ही डोळ्याने बघितले. श्रीमंताची आई म्हणजे आई आणि आम्हा गरिबांची आई म्हणजे आई वाटत नाही. असा भेदभाव करणारा गृहमंत्री आम्हाला मान्य नाही.आजही तुम्ही अंतरवाली सराटी या ठिकाणी आल्यानंतरने अनेक म्हातारी लोक पलंगावरती दिसतील. यामध्ये कुणाचे गुडघे फुटलेत तर कुणाच्या शरीरामध्ये गोळ्या घुसल्या आहेत.लीलावतीच्या डॉक्टरांना देखील या गोळ्या निघाल्या नाहीत. देवेंद्र फडणवीस हे काय आमचे शत्रू नाहीत, दुश्मन नाहीत वैरी देखील नाहीत, पण जेव्हापासून हल्ला केला तेव्हापासून ते आमच्या मनातून उतरले आहेत.

– आदिलशाहीच्या काळात देखील असा हल्ला झाला नसेल, पण अंतरवलीच्या किंकाळ्या ऐकला असता, तर तुम्ही बेशुद्ध पडला असता. पण आता नाटकं करायची नाहीत, सरकारने पुन्हा अशा भानगडीत पडायचे नाही.तुमच्यामुळे तुमचा (राज्य सरकारचा) कार्यक्रम होणार म्हणजे होणार. पण तुमच्यामुळे मोदी सरकारचा देखील बट्ट्याबोळ होईल. असा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

## संक्षिप्त...

### नवी मुंबई पालिकेसमोर उपोषणासाठी बसलेल्या महिलेची प्रकृती चिंताजनक

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** पालिकेसमोर उपोषणासाठी बसलेल्या महिलेची प्रकृती चिंताजनक झाली आहे.दोन दिवसांपासून नवी मुंबई पालिकेसमोर संपूर्ण कुटुंब आंदोलन करत आहे. पालिकेतील अधिकाऱ्यांनी २० कोटींचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी अन्न व पाणी त्याग उपोषण सुरू आहे. दुसऱ्या दिवशी सुद्धा हे उपोषण सुरूचं आहे. या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी करत नवी मुंबई महापालिकेच्या समोर अमरण उपोषणाला अख्खे कुटुंब बसले आहे.अरुणीना भगत अस या उपोषणकर्त्या महिलेची प्रकृती चिंताजनक असून तिला रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही पालिकेने कोणतीही भूमिका याबद्दल मांडलेली नाही

### उत्तर काशी दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील एकोणावीस जण अडकले



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** उत्तर कशी दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील एकोणावीस जण अडकले आहेत. त्यात जळगाव शहरातील तीन, पाळधी गावातील १३, धरणगाव येथील दोन तर पाचोरा येथील एका जवानाचा समावेश आहे. एकोणावीस जणांपैकी जळगाव शहरातील आयोध्या नगर येथील मेहरा कुटुंबातील तिघांशी जिल्हा प्रशासनाचा संपर्क झाला आहे. उर्वरित १६ जणांशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. उत्तरकाशी येथे अडकलेल्या १९ जणांपैकी पाचोरा येथील सोपान अहिरे या जवानाचा देखील समावेश आहे. जिल्हा प्रशासनाकडून जळगाव जिल्ह्यातील उत्तरकाशी येथे अडकलेल्या भाविकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली आहे. उत्तरकाशी येथे अडकलेल्या १९ जणांमध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाळधी गावातील १३ जणांचा समावेश आहे.

### महिलेस मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मंगरूळपीर/प्रतिनिधी :** महिलेस मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी ६ ऑगस्ट रोजी तीन जणांवर गुन्हा दाखल केला आहे.प्राप्त माहितीनुसार लक्ष्मी सचिन धोंगळे वय २२, रा.गिंभा या महिलेने तक्रार दिली की, ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजता पती व मी घरासमोर हजर असताना आरोपी सुनील नारायण धोंगळेने म्हटले की, तु माझ्या जागेत झोपडे का, बांधले या कारणावरुन वाद घालून शिवीगाळ केली व मारण्याची धमकी देवुन त्याचे हातातील धारदार शस्त्राने डाव्या हाताचे दंडावर मारुन जखमी केले. नारायण धोंगळे, शांताबाई धोंगळे यांनी फिर्यादी व तिचे पतीस मारहाण केली व शिवीगाळ केली. सदर घटनेप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### इस्लामपूर शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या मागणीसाठी टक्कर मोर्चा आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :**इस्लामपूरात अण्णाभाऊंचा पुतळा व स्मारक व्हावे. अशी ३०-४० वर्षापासून मागणी होत आहे. परंतु प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याकडून कायमच अण्णाभाऊंना उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न झाला आहे. इस्लामपूरात १ ऑगस्ट रोजी जयंती महोत्सव समितीच्या वतीने इस्लामपूर तहसिलदार कचेरीसमोर सत्यशोधक अण्णाभाऊंचा अर्धपुतळा बसविला आहे. त्याच ठिकाणी पुतळा कायमस्वरूपी व्हावा. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करून महापुरुषाचा सन्मान करावा अशी मागणी आहे.

गनिमी कावा करून तात्पुरता बसवलेला पुतळा पोलिसांकडून हटवला जावू नये म्हणून कार्यकर्त्यांनी २४ तास पहारा ठेवला आहे. मंगळवारी कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी मुंडन केले होते. तर आज बुधवारी इस्लामपुरातील वाळवा पंचायत समिती परिसरातील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन करून टक्कर मोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून हा मोर्चा तहसीलदार कचेरी चौकात आला. तिथे पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. पोलीस प्रशासनाने मोर्चेकरांना तहसीलदार कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर रोखले.

प्रवेशद्वारावर गोंधळ सुरू असतानाच डॉ.बाबासाहेबांच्या आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्या समोरील मुख्य रस्त्यावर तरुणांनी रस्त्यावर डोके आपटून घेत निषेध व्यक्त केला. रक्तबंबाळ झालेल्या तिघांना पोलिसांनी रूग्णालयात उपचारासाठीहलवले.

## रक्षाबंधन सणानिमित्त नवी मुंबईतील बाजारपेठा सजल्या





**नवी मुंबई/प्रतिनिधी :**रक्षाबंधन सणानिमित्त नवी मुंबईतील बाजारपेठ या समजल्या आहेत, विविध प्रकारच्या राख्या बाजारात दाखल झाल्या आहेत. त्याचबरोबर लहान मुलांसाठी देखील विविध कार्टूनचे राख्या उपलब्ध आहेत. सध्या २० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंत राख्या उपलब्ध आहेत. तर मागच्या वर्षी पेक्षा यंदा मात्र किंमत कमी झाली आहे. त्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद देखील चांगला मिळत आहे. रक्षाबंधनच्या एक दिवस आधी ग्राहक अधिक खरेदी करणार असल्याचं व्यापाऱ्यांनी म्हटलं.

## कल्याणमधील एटीएम फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न फसला, बाजारपेठ पोलिसांकडून चार तासात दोन चोरट्यांना बेड्या





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पश्चिमेकडील शंकरराव चौकात असलेल्या एका नामांकित बँकेचे एटीएम फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न फसला. मात्र चोरट्याने केल्या प्रयत्नात एटीएम चे मात्र नुकसान झाले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच सीसीटीव्हीच्या मदतीने बाजारपेठ पोलिसांनी चार तासात दोन चोरट्यांना अटक केली आहे. मंगेश जगताप आणि नौशाद अन्सारी अशी या चोरट्यांची नावे आहेत.

कल्याण पश्चिमेकडील शंकरराव चौकात चोरट्यांनी धाडस करत काल रात्रीच्या सुमारास यातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. एटीएम फोडण्यात चोरट्यांना अपयश आले तर दोन्ही चोरटे सीसीटीव्ही कैद झाले एटीएम ची तोडफोड होत असल्याचे लक्षात येतात या प्रकरणी तातडीने बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर बाजारपेठ पोलिसांनी अवघ्या चार तासात दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान चोरट्यांनी एटीएम फोडण्याच्या केलेल्या प्रयत्नामुळे एटीएम मशीनचे मोठे नुकसान झाले आहे.

## परळीत १ लाख ४० हजार मताने कसे निवडून आले लोकांना माहिती आहे : आ. सुरेश धस

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी :** बोटाला शाई लावायची आणि परत जायचे, बटन कोण दाबायचे. हे मतदाराला माहीत नाही. परळीत त्याच्यामुळे १ लाख ४० हजार मताने तुम्ही कसे निवडून आले लोकांना माहिती आहे. अशी टीका आमदार सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना केली.

जिल्ह्यातल्या १३ ते १४ खासगी पतसंस्थांमध्ये ५ ते ६ हजार कोटी रूपये गोर-गरिबांचे अडकलेले आहेत. यामध्ये सुसूत्रता आणली पाहिजे. सामान्य ठेवीदारांना न्याय मिळावा, अशी मागणी केली. आम्ही उपस्थित असलेल्या सर्वच आमदारांनी केली. मकोकातले आरोपी जर आकाच्या केसला जिल्हा न्यायालयात येऊन जात असतील, तसेच गोट्या गित्ते सारखा आरोपी अटक झाला पाहिजे. मकोकातला आरोपी नंदागौळच्या पुढे रेल्वे ट्रॅक वर बसून वक्तव्य करत असेल, तर बीड पोलिसांच्या दृष्टीने हे चांगले नाही.महादेव मुंडे हत्या प्रकरणात देखील मिटवा-मिटवी करण्याचे काम पोलीस अधिकाऱ्यांनी केले आहे. त्यांची नावे ज्ञानेश्वरी कुमावत यांना सांगतील. महादेव मुंडे हत्या प्रकरणासोबतच बापु आंधळेच्या खुनाचा तपास झाला पाहिजे. सब-ऑर्डिनेटवर अवलंबून राहू नये. भीतीचे वातावरण निश्चित कमी झालेले आहे. मात्र, क्राइम रेट कमी झालेला नाही. त्याला काही कालावधी लागेल.

पोलिसांनी आवाहन केलेलं आहे. त्याप्रमाणे निश्चित काही लोक पोलिसांना महादेव मुंडे हत्याप्रकरणी माहिती देतील. ती १२ गुंठे जमीन परत घेऊन टाका, आणि हे मिटवा असे सुद्धा निरोप त्यांच्यापर्यंत आलेले आहेत. परळीत कितीतरी लोक सांगतील की, बोटाला शाई लावायची आणि परत जायचे, बटन कोण दाबायचे. त्याच्यामुळे १ लाख ४० हजार मताने तुम्ही कसे निवडून आले लोकांना माहिती आहे.सुशील कराडचा महादेव मुंडे हत्या प्रकरणात संबंध नाही. आकाच्या दुसऱ्या मुलाचा संबंध आहे. असा आरोप आमदार सुरेश धस यांनी माध्यमांची बोलताना केला.

## टोमॅटोला आलाय सोन्याचा भाव! बाजार समितीकडून मार्गदर्शक सूचना जाहीर

**नाशिक/प्रतिनिधी :** टोमॅटोला सध्या बाजारात चांगले दर मिळत असल्याने नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात टोमॅटो विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग येत असल्याने, विक्री प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक ठेवण्यासाठी बाजार समितीने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

बाजार समितीने स्पष्ट केले आहे की, शेतकऱ्यांनी आपला टोमॅटो शेतीमाल योग्य प्रकारे वर्गवारी करून (जसे की – लाल, कच्चा, गोल्टी) वेगवेगळ्या क्रेट्समध्ये पॅक करून विक्रीसाठी आणावा. टोमॅटोचे वजन क्रेटसह २२ किलो गृहीत धरले जाणार आहे. त्यामुळे वजन करताना आणि व्यवहार करताना याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. टोमॅटोचे वजन इलेक्ट्रॉनिक काट्यावर घेतले जाणार असून, त्यानंतर संबंधित खरेदीदाराकडून अधिकृत सौदापट्टी घेणे बंधनकारक आहे. या सौदापट्टीवर नमूद असलेले वजन व भाव तपासून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड या सौदापट्टीवर करू नये. लाल रंगाची सौदापट्टी बाजार समितीत जमा करावी लागेल आणि हिरव्या सौदापट्टीवर बाजार समितीचा अधिकृत शिक्का घेणे अनिवार्य राहील.

## राज्यातील जमीन मोजणीचे काम अधिक सुलभ अचुकतेने आणि जलद गतीने होण्यासाठी अत्याधुनिक रोव्हर्स महत्त्वपूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महसूल आणि भूमीअभिलेख विभागाला मनुष्यबळाच्या तुलनेत सध्या १२०० रोव्हर्सची आवश्यकता असून खरेदीसाठी १३२ कोटी आणि महसूलमधील बांधकाम सुरू असलेल्या कामांसाठी १६०० कोटींची तरतूद करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

बैठकीला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पुण्यातून जमाबंदी आयुक्त तथा भूमी अभिलेख संचालक सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे उपस्थित होते.यावेळी अजित पवार यांनी राज्यात जमीन मोजणीसाठी ई-मोजणी २.० ही आज्ञावली लागू करण्यात आली असून मोजणीनंतर रोव्हर्सद्वारे अक्षांश, रेखांश निश्चित करून जीआयएस प्रणालीमध्ये डिजिटल स्वरूपात मोजणी नकाशाची क प्रत जनतेला उपलब्ध होत आहे. सध्या भूमी अभिलेखच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार चार हजार रोव्हर्सची आवश्यकता असून त्यातील १२०० रोव्हर्सच्या खरेदीला मान्यता देत येत आहे. याची टेंडर प्रक्रिया त्वरित सुरू करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तर, राज्यातील भूमी अभिलेख कार्यालये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जवळपास राहतील, यासाठी प्रयत्न करावा. तहसीलदार हा तालुक्यातील प्रमुख असतो, त्यांनी वाळू उपसा होणाऱ्या ठिकाणी छापा मारावा लागत असल्याने पोलिसांच्या सारख्या गाड्या घेण्याची सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.



# पेनटाकळी प्रकल्पातील पाणी पाझरामुळे नुकसान झालेल्या उर्वरीत १०९ शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई!

■ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या बैठकीत झाला निर्णय
■ केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नांना यश!

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पेनटाकळी प्रकल्पातील पाणी पाझरामुळे नुकसान झालेल्या पणअहवाल यादीतुन सुटलेल्या तब्बल १०९ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा महत्वपुर्ण निर्णय विदर्भ पाटबंधारे नियामक मंडळाच्या बैठकीत झाला आहे. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कडे अनेक शेतकऱ्यांनी नुकसानग्रस्त अहवाल यादीत नांव नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या . या तक्रारींची दखल घेत त्यांनी संबधित विभागाला सुचित केले होते. त्यांनुसार निर्णय घेण्यात आला आहे.

बुलढाणा जिल्हयातील पेनटाकळी प्रकल्पातील मुख्य कालवा अंतर्गत येणाऱ्या ० ते ११ मधील शेतकऱ्यांचे पाणी पाझरामुळे नुकसान झाले होते. परंतु नुकसान अहवाल यादीमधुन काही शेतकरी सुटले होते. या शेतकऱ्यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या कडे या संदर्भांत तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार संबधित विभागाला या संदर्भांत सुचित केले होते.

जलसंपदा विभागाच्या नियामक मंडळाची बैठक दि ०५/०८/२०२५ रोजी संपन्न झाली या बैठकीत पेनटाकळी प्रकल्पाच्या मुख्य कालवा कि. मी. ० ते ११ मधील पाणी पाझरामुळे झालेल्या नुकसान एकुण-१०९ शेतक-यांचे एकुण ६६.२७ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे करण्यात येऊन एकूण किंमत रु. ८६,४८,२३५/- एवढ्या रक्कमेचा नुकसान भरपाईचा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली आहे.

या पुर्वीही ५.३९ कोटींची शेतकऱ्यांना मिळाली नुकसान भरपाई

पेन टाकळी प्रकल्पातील मौजे-दुधा व रायपुर या शिवारातील शेतजमीनीत जास्त प्रमाणात पाझर आढळुन आला, त्यामुळे पाझराबाबत शेतक-यांच्या तक्रारी येत गेल्याने ना प्रतापराव जाधव यांनी मुख्य कालव्याच्या पाणी पाझरामुळे झालेल्या नुकसानीचा सर्व्हेक्षण करुन नुकसान भरपाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचविले होते.

त्या अनुषंगाने संयुक्त नुकसानीचा अहवाल दि. २१/०५/२०२१ रोजी तयार करण्यात आला. सन २००३ ते २०२० पर्यंत ज्या वर्षी कालव्याव्दारे सिंचन झाले त्यावर्षीचा नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला. सदरच्या नुकसान भरपाईची परिगणना करतांना महसुल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार करण्यात येउन संपुर्ण प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास सादर करण्यात आला.

सदर नुकसान भरपाईच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या ठराव क्रं. ८२/१७ नुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर अंतर्गत पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलढाणा या प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून होणा-या पाण्याच्या पाझरामुळे सन २००३ ते २०२० या कालावधीत कालव्या लगतच्या मौजे-पेनटाकळी, दुधा, रायपुर व पांचला ता. मेहकर या चार गावाच्या शिवारातील एकुण ४३२.१५ हेक्टर बाधीत झालेल्या क्षेत्राकरिता रु. ५.३९ कोटी रुपये एवढया रकमेस नियामक मंडळाची मंजुरात प्राप्त झालेली असुन, सदरचा निधी प्राप्त झाल्याने आजपावेतो जवळपास ९८ % खातेदारांस नुकसानीचा मोबदला या विभागा मार्फत अदा करण्यात आलेला आहे. या नुकसान भरपाई वाटपातुन सुटलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भांत नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिल्या होत्या. त्यानुसार पेनटाकळी प्रकल्पाच्या मुख्य कालवा कि. मी. ० ते ११ पर्यंत सन २००३ ते २०२० पर्यंत सिंचनाकरिता पाण्याचा विसर्ग सोडल्यामुळे कालव्या लगतच्या मौजे- पेनटाकळी, दुधा, रायपुर, सोनार गव्हाण सावत्रा, टाकरखेड व पांचला या ७ गावांमधील शेतक-यांचे पाणी पाझरामुळे काही क्षेत्र बाधीत होत आहे. सदर बाधीत होत असलेल्या शेतक-यांच्या प्राप्त अर्जानुसार याधीत नुकसानग्रस्त शेतकरी यांचे समवेत ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक व जलसंपदा विभागांचे अभियंता पानी संयुक्तपणे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन सविस्तर सर्वोक्षण करुन बाधीत झालेले क्षेत्र अंतिम करण्यात आले होते त्यामध्ये उपरोका ७ गावांमधील पाणी पाझरामुळे नुकसानग्रस्त एकुण १०९ शेतक-यांचे एकुण ६६.२७ हेक्टर क्षेत्र बाधीत झालेले आहे. सन २००३ ते



२०२० पर्यंत ज्यावर्षी सिंचन करण्यात आले, त्यावर्षाचा नुकसान भरपाईचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदरच्या नुकसान भरपाईची परिगणना करतांना महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार करण्यात येऊन बाधीत क्षेत्राच्या मुल्यांकनाची एकुण किमत रु. ८६,४८,२३५/- एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळणार आहे. नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याने केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना १०९ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचा मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

## विविध वृत्त...

### विहिरीत हातपाय बांधलेला मृतदेह आढळला, मलकापूर तालुक्यातील धानोरा येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील धानोरा येथील एका विहिरीत हातपाय बांधलेला ४८ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. याप्रकरणी मलकापूर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून, घटनेचा तपासा सुरू केला आहे. विहिरीतील मृतदेह हा धानोरा येथील घनश्याम भुतडा राहणार खामगाव यांचा असल्याचे समोर आले असून, हातपाय बांधलेल्या अवस्थेत मृतदेह होता. त्यामुळे पोलिसांना घातपाताची शंका बळावली असून, त्यादृष्टीने तपास सुरू आहे. तर मृतकाच्या नातेवाईकांनी सुद्धा घटनेचा सखोल तपास करण्याची मागणी केली आहे. घनश्याम भुतडा हे दोन दिवसांपूर्वी खामगाव येथून शेगाव येथील एका महाविद्यालयात आपल्या मुलाच्या ॲडमिशनसाठी जात असल्याचे घरून गेले होते, ते परतले नसल्याने खामगाव शिवाजीनगर पोलिसात या प्रकरणी कुटुंबीयांकडून हरवल्याची तक्रार नोंदविण्यात आली होती.

### शिक्षक भरती घोटाळ्या प्रकरणी एसआयटीत कोण कोण आहे याची लवकरच माहिती मिळेल- दादा भुसे



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या एसआयटीमध्ये कोण कोण आहे, याची तुम्हाला लवकरच माहिती मिळणार. यात कोणावरही अन्याय होणार नाही. शिक्षण विभाग म्हणून आमची ते जबाबदारी आहे. जो कोणी निरअपराध आहे त्यांच्यावर अन्याय होणार नाही, चुकीच्या काम बिलकुल होणार नाही, परंतु चौकशी मध्ये जो कोणी दोषी आढळून आला त्याच्यावर निश्चित ही कारवाई होणार.

### सहकारी संस्थांकडून सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित; १८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सहकार विभागामार्फत राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यासाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील कामगिरीच्या आधारे संस्थांची निवड केली जाणार आहे.

सदर निवड प्रक्रियेचा कालबद्ध कार्यक्रम पूर्वी घोषित करण्यात आला होता. मात्र, संस्थांना अधिक वेळ मिळावा या उद्देशाने दुसऱ्यांदा या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून, पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याची १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सहकार पुरस्काराशी संबंधित सविस्तर माहिती सहकार विभागाच्या संकेतस्थळावर http://sahakarayukta.maharashtra.gov.in तसेच जिल्हा उपनिबंधक व तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयात उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत आणि पात्र असलेल्या सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव, आवश्यक कागदपत्रांसह, स्वतःच्या तालुक्यातील सहाय्यक निबंधक कार्यालयात १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन , सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी केले आहे.

### जिल्हा स्त्री रुग्णालयात बाल हृदयरोग तपासणी शिबीर संपन्न

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलडाणा येथे दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी बालकांचे हृदयरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी तज्ज्ञांव्दारे हृदयरोग संदर्भात मार्गदर्शन करुन ११३ बालकांची हृदयरोग तपासणी करण्यात आले.

या शिबीरासाठी सत्यसाई हॉस्पिटल, खारघर-मुंबई येथून आलेल्या विशेष तज्ज्ञांच्या पथकाने बालकांची सखोल तपासणी केली. शिबीरात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत प्राथमिक तपासणीत संदर्भित करण्यात आलेल्या बालकांची पुढील तपासणी करण्यात आली. शिबीरासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी मार्गदर्शन करताना तपासणीअंती शस्त्रक्रियेस पात्र ठरणाऱ्या बालकांसाठी ॲक्शन प्लॅन तयार करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या शिबीरात जिल्हा स्त्री रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबीराचे आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा समन्वयक दिलीप नरवाडे आणि व्यवस्थापक डॉ. जुनेद मिर्झा यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# नियमभंग करणाऱ्या ४३ बियाणे व १५ खत विक्रेत्यांना कृषी विभागाच्या नोटिसा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** राज्यात खरीप हंगाम २०२५ पासून प्रमाणित व सत्यतादर्शक बियाण्यांची विक्री,वितरण हे साथी पोर्टल द्वारे करणे शासनाने बंधनकारक केले आहे. कृषी व पदुम विभागाच्या २५ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, बियाणे विक्रेत्यांनी व बियाणे कंपन्यांनी विक्रीसाठी साथी पोर्टलचा वापर करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने वेळोवेळी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले होते. जिल्ह्यात कृषी विकास अधिकाऱ्यांनी तालुका व जिल्हा स्तरावर एकूण ८ प्रशिक्षण कार्यक्रम घेतले होते. तरीही काही बियाणे विक्रेत्यांनी साथी पोर्टलचा वापर न करता बियाण्यांची विक्री केल्याचे आढळून आले. शासनाच्या स्पष्ट सूचनांचे उल्लंघन केल्यामुळे कृषी विभागाने जिल्ह्यातील एकूण ४३ बियाणे विक्रेत्यांना आणि १५ खत विक्रेत्यांना नोटीस बजावल्या आहेत.

**बियाणे वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता**

शोधयोग्यता सुनिश्चित बनावट कालबाह्य बियाण्यांवर नियंत्रण उत्पादन कंपन्या, वितरक व विक्रेत्यांमध्ये समन्वय परराज्यातून येणाऱ्या बियाण्यांवर देखरेख शासनाच्या ध्येयधोरणानुसार शेतकऱ्यांना दर्जेदार खते व बियाणे मिळण्यासाठी सर्व परवानाधारक विक्रेत्यांनी ईपॉस प्रणाली तसेच साथी पोर्टलवरील डेटा अद्ययावत ठेवणे अत्यावश्यक असल्याचे कृषी विभागाने कळविले आहे.

खते विक्रीतही अनियमितता


अनुदानित खते एफएमसी प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाच्या आधारे विक्री करणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्ष साठा व ऑनलाइन दाखवलेला साठा यामध्ये तफावत आढळल्यामुळे केंद्र शासनाकडून पुढील खतसाठा मिळण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.गुणनियंत्रण पथकाची कारवाई जिल्हा भरारी पथक आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत पुढीलप्रमाणे नोटीस बजावण्यात आल्या आहेत. सर्व विक्रेत्यांना २ दिवसांच्या आत खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले असून, खुलासा समाधानकारक न आढळल्यास संबंधितांचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

# महसुल सप्ताहानिमित्त आज मोताळा येथे मार्गदर्शन शिबीर; नागरिकांनी लाभ घ्यावा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि. १ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभर महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नागरीकांच्या शासकीय कामकाजाशी संबंधित अडचणी दूर करण्यासाठी भूमि अभिलेख विभागाच्या वतीने मोताळा तहसील कार्यालय येथे आज दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ यावेळेत विशेष मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भूमि अभिलेख उपअधीक्षक यांनी केले आहे.

या शिबीरामध्ये नागरीकांना भूमि अभिलेख विभागाशी संबंधित विविध कामांबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये शेतजमीन मोजणी अर्ज, नकाशा किंवा अभिलेखाची नक्कल मिळविण्याचे अर्ज, तसेच मालमत्तेशी संबंधित फेरफार अर्ज-वारस लावणे, खरेदीने नोंद, बोजा नोंद, हक्क सोडलेख, बक्षीसपत्र नोंद आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नागरिकांनी शासकीय कार्यालयातील कामकाजासंदर्भातील माहिती मिळवून आपली कामे सुलभपणे पार पाडावी यासाठी या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शालेय शिक्षण मंत्री रमलेत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसोबत



**बुलढाणा/प्रतिनिधी :** विद्यार्थी पटसंख्या शून्य झाल्यानं तब्बल दोन वर्ष कुलूपबंद झालेल्या आणि आता सुमारे १५० पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या गणेशपुर येथील शाळेला शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज अचानक भेट दिली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री थेट आपला व्यस्त दौरा सोडून शाळेकडे पोहोचल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थही भारावलेत. पटसंख्या शून्य झाल्याने गणेश खुर्चीं जिल्हा परिषद शाळा दोन वर्षांपूर्वी शिक्षण विभागाने बंद केली होती. मात्र त्यानंतर गणेशपुर येथील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांच्या पुढाकारातून आता ही शाळा पुन्हा एकदा सुरू झाली असून आता इथे १५० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गणेशपुरच्या जिल्हा परिषद शाळेनं आता एक नवा आदर्श निर्माण केलाय. या शाळेची माहिती मिळताचं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसेंनी गणेशपुर जिल्हा परिषद शाळेला भेट देत तेथील विद्यार्थ्यांशी हितगुज साधला. विद्यार्थ्यांसोबत हितगुज साधून त्यांच्यासोबत ते रमल्याचं चित्र बघायला मिळालं. यावेळी दादा भुसेंनी गणेशपुर ग्रामस्थ, शिक्षक पालक यांचं अभिनंदन करीत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

# स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन उत्साहात साजरा

## आरोग्य संवर्धन विषयक मार्गदर्शन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन म्हणून दरवर्षी १ ऑगस्ट हा दिवस साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय, बुलढाणा येथे आरोग्य संवर्धन या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शन सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्थानिक निधी लेखापरिक्षा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कोषागार अधिकारी ऋषिकेश वाघमारे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी पंडीतराव मांडोगडे, निवृत्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रल्हाद ताठे, निवृत्त सहायक संचालक दिनकर बावस्कर आणि संघटनेचे विभागीय अध्यक्ष राजेश वडतकार यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचा एक विशेष आकर्षण म्हणजे आरोग्य संवर्धन विषयक मार्गदर्शन सत्र होय. या सत्रात डॉ. अश्विनी जाधव यांनी दैनंदिन जीवनशैलीतील छोटे-छोटे बदल, व्यायाम, आहार आणि मानसिक आरोग्य यावरील मार्गदर्शन दिले. चुकीच्या जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या विकारांपासून संरक्षण कसे मिळवावे, याचे सखोल विवेचन त्यांनी केले.

कार्यक्रमाला संघटनेचे जिल्हाध्यक्ष व कार्यालय अधीक्षक दीपक सावंत, जिल्हा सचिव गोपाल ढोले, राज्य कार्यकारिणी महिला प्रतिनिधी मिरा ठाकरे, कोषाध्यक्ष सागर बोकडे, सहसचिव किशोर पवळ, सल्लागार संदीप साखरे, मार्गदर्शक प्रकाश पाटील, गणेश साबळे यांच्यासह अनेक सदस्य व स्थानिक अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्था. नि.ले.परिक्षा सहायक संचालक देविदास पाटील यांनी केले. तर सूत्रसंचालन कनिष्ठ लेखापरिक्षक डिगंबर बावस्कर व कनिष्ठ लेखापरिक्षक गोपाल पाफळणारे यांनी आभारप्रदर्शन केले.

# महसुल सप्ताह निमित्त शेतकऱ्यांना कुळात मिळालेल्या जमिनीचे सातबारा वरील शर्तीचा शेरा कमी करण्याची कार्यवाही

दैनिक आपला विदर्भ

**बार्शीटाकळी/प्रतिनिधी :** बार्शीटाकळी तहसील येथे महसूल सप्ताह निमित्त आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी बार्शीटाकळी तहसील अंतर्गत कुळ कायदा कलम ४३, ५०-ब आणि ५७ चे झालेल्या सुधारणेच्या अनुषंगाने कुळाने जमीन खरेदी करून १० वर्षे पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांची माहिती सादर करण्याचे मंडळ अधिकारी यांना निर्देशित करण्यात आले.




यामध्ये अशा शेतकऱ्यांकडून जमीन महसूल आकारणीच्या चाळीस पट नजराणा रक्कम तलाठी यांनी भरून घेण्याची कार्यवाही करावी व तदनंतर तलाठी यांनी अशा सात बारा उताऱ्यावरील शर्तीचा शेरा कमी करण्याबाबत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना सूचित करण्यात आले.

सदर अभियानामध्ये आज तहसील कार्यालय बार्शीटाकळी येथे प्रतिनिधिक स्वरूपात तहसीलदार राजेश वझीरे यांचे हस्ते मौजे जलालाबाद येथील शेतकरी मिलिंद अंबादास तायडे यांना त्यांचे कुळात मिळालेल्या जमिनीचे आकारणीच्या चाळीस पट नजराणा रक्कम भरून घेऊन त्यांचे सातबारा वरील शर्तीचा शेरा कमी करून फेरफार व सातबारा देण्यात आला.

सदर कार्यवाही तलाठी जलालाबाद सुदेश चऱ्हाटे, मंडळ अधिकारी राजंदा संतोष कर्नेवार व सहायक डीबीए विशाल काटोले यांनी पार पाडली. तरी कुळात जमीन मिळून १० वर्ष पूर्ण झालेल्या शेतकऱ्यांनी या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार राजेश वझीरे यांनी केले आहे.